# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक ०४.१०.२०२६ रविवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमणा :—शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०३.१०.२०२६ चे १७.४५ वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, चिखली चौकाकडून कळमणा रेल्वे स्टेशनकडे जाणारे सिमेंट रोडवर एक इसम हातात मोठा चाकु घेवून येणारे जाणारे लोकांना शिवीगाळ करुन धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम हातात चाकु घेऊन धुमाकुळ घालतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेऊन त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव ओमप्रकाश उर्फ ढोकु सुरेश निषाद वय १९ वर्षे रा. घर क्र. ११७७/बी/२४, रुपचंद किराणा दुकानाजवळ, पुराना बाजार चौक, डिप्टी सिग्नल, कळमणा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि गजानन राऊत यांचे तक्रारीवरुन आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.१०.२०२६ चे ०३.०० वा. ते ०६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत दत्तमंदीर जवळ, तांडापेठ, चंद्रभागा नगर येथे राहणारे फिर्यादी पवन रत्नाकर कोलटकर वय २६ वर्ष यांचे राहते घराचे वरच्या माळयावरील रुमचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने कुलुप तोडून, आंत प्रवेश करून, रुममधील लोखंडी आलमारीचे लॉक तोडून त्यातील रोख १,५०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,३९,२००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादीची आई सकाळी ०६.०० वा. वरील रुमची सफाई करण्याकरीता गेली असता, घरफोडी झाल्याचे दिसुन आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. नरेश पंडीत यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे नवीन कामठी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०३.१०.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, नवीन कामठी पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नेरी गावाजवळ, नागोबा मंदीरसमोरील परिसरात येथे कत्तलीकरीता गोवंशीय जनावरांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नवीन कामठी पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन

पंचासमक्ष पाहणी केली असता, नागोबा मंदीरसमोरील शेतात १५ गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपने व चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले मिळुन आले. जनावरांजवळ कोणीही दिसुन न आल्याने पोलीस पाटील यांना नमुद जागेबाबत विचारणा केली असता, त्यांनी नमुद जागा जगदंबा ले आऊट असल्याचे सांगितले. व जागेचे मालका बाबत काहीही माहिती नसल्याचे सांगितले. गोवंशीय जनावरे यांना दोन दिवसांपासुन चारापाणी यांची व्यवस्था न करता बांधुन ठेवली असल्याचे गावातील लोकांनी सांगितले. नमुद जनावरांचे मालकाबाबत काहीही माहिती मिळाली नाही. घटनास्थळावरुन १५ गोवंशीय जनावरे कि. २,८०,०००/— रु. ची जप्त करुन त्यांना गोशाळा पशुपालन बहुउद्येशीय संस्था, बिडगाव रोड, भांडेवाडी येथे दाखल करण्यात आले आहे.

यापकरणी सरतर्फे पोअं आकाश मनवर यांचे तक्रारीवरुन गोवंशीय जनावरे यांना क्रुरपणे व चारापाणीची व्यवस्था न करता, कत्तलीकरीता बांधुन ठेवणारे अज्ञात आरोपीविरूध्द पोलीस ठाणे नवीन कामठी येथे कलम ५(ब),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११ (१) (फ) (ह) (आय) प्राणी क्रुरता अधिनियम —१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>४) पोलीस ठाणे शांतीनगर :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत, श्रीहरी रोड, मुदलियार चौक येथे राहणारे फिर्यादी नामे निखिल संदीप मसरके वय २६ वर्षे यांची ओळख सन २०२५ मध्ये आरोपी १) प्रतिक युवराज उराडे वय २५ वर्षे रा. विनोबा भावे नगर, गल्ली क्र. २५, यशोधरानगर, नागपुर याचेसोबत झाली होती. आरोपीने फिर्यादी यांना त्याचा एक मित्र हा मेट्रो रेल्वे व मनपा येथे नौकरीस लाऊन देऊ शकतो. जागा निघाल्यास मला कॉल करशील असे सांगीतले होते. फिर्यादी यांनी सप्टेंबर २०२५ मध्ये त्यांचे मोबाईलवर नागपुर म.न.पा येथे कनिष्ठ लिपिक पदाची जाहीरात पाहून, आरोपी क्र. १ सोबत संपर्क केला. आरोपीने त्याचा साथीदार आरोपी क्र. २) विशाल जाधव वय ३५ वर्ष रा. अमरावती व इतर एक याचेसोबत ईतवारी रेल्वे स्टेशनजवळ एका कारमध्ये भेट घालुन दिली. त्यांनी फिर्यादी व त्यांचे वडीलांना नौकरीकरीता १८ लाख रुपये द्यावे लागतील असे सांगितले. फिर्यादी यांनी विचार करुन सांगतो असे म्हटले. त्यानंतर फिर्यादी हे १२ लाख रुपये देण्यास तयार झाले असता, आरोपींनी त्यांचे इतर साथीदार आरोपी क्र. ३) स्वप्निल सहारे वय ३० वर्ष ४) रोशन वानखेडे वय ३० वर्ष ५) दिगांबर शिंदे वय २५ वर्ष ६) सचिन राठोड वय ३५ वर्ष ७) अरविंद चौधरी वय ४० वर्ष रा. शंकरनगर, धरमपेठ, नागपूर यांचेसोबत संगनमत करुन, दिनांक ०१.०९.२०२५ ते ०१.०७.२०२६ चे दरम्यान, फिर्यादीस मनपा नागपूर येथे कनिष्ठ लिपिक पदावर नौकरी लावुन देण्याचे आमिष दाखवून, फिर्यादीची चंद्रपुर येथे परिक्षा घेऊन, फिर्यादीस नागपूर येथे खोटे नियुक्तीपत्र देऊन फिर्यादीकडून ऑनलाईन व रोख असे एकुण १२ लाख रुपये घेऊन, कोणतीही नौकरी लावुन न देता व रक्कम परत मागीतली असता, आरोपीने उडवा—उडवीचे उत्तरे देवुन, टाळाटाळ करून, कोणतीही रकम परत न करता, फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे पोउपनि. अमित कुंभार ७७७६९२७२४४ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४),३३६(३),३४०(२),३(८५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**